**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

जाहिरात व परवाने (मुख्यालय ) विभाग

**आगामी दिवाळी सणानिमित्तफटाके विक्री करीता खुल्या जागांची जाहिर लिलाव नोटिस**

---

विस्फोटक नियम २००८ नियमांचे पालन करुन **नियमानुसार जाहिर लिलावप्रक्रियाद्वारे खालील अटी-शर्तीवर मनपाचे सहा विभागीय कार्यालयांच्या** अखत्यारितील खालील नमूद केलेल्या खुल्या जागा इ. क्षेत्र प्रत्येकी १० X १० चौ.फु. खुली जागा, दि.२८/१०/२०२१ ते दि. ०६/११/२०२१ अखेर या कालावधीकरीता संबंधित विभागीय अधिकारी यांचे नियंत्रणात विभागीय कार्यालयांमध्ये दि. २१/१०/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता खालील नमुद ठिकाणी लिलाव प्रक्रिया आयोजित करणेत आली आहे. तरी इच्छुकांनी लिलावाच्या दिवशी वेळेत उपस्थित रहावे.

| अ. नं. | मनपा मालकीच्या खुल्या जागेचे ठिकाण | गाळयांकरीता आरक्षित जागा संख्या | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| **अ)** | **नाशिक पूर्व विभाग** | | विभागीय कार्यालय नाशिक पूर्व दगडी इमारत मेनरोड, नाशिक येथील सभागृहात |
| १ | सर्व्हे नं.८८४/८८५, युनिक मैदानाशेजारी, चेतनानगर (राणेनगर कॉर्नर), शारदा विद्यालय समोरील खुली जागा | १ ते १० | |
| २ | पोर्णिमा बसस्टॉपजवळ खुल्या जागेत | १ ते ५ | |
| ३ | कलानगर चौकासमोर संताजीनगरमनपा. मोकळी जागेत, इंदिनगर | १ ते २ | |
| ४ | साईनाथनगर, सिग्नल भाजी मार्केट शेजारील जागा | १ | |
| **ब)** | **नाशिक पश्चिम विभाग** | | विभागीय कार्यालय (नाशिक पश्चिम)नवीन पंडित कॉलनी, नाशिक येथील पहिला मजल्यावरील सभागृहात |
| १ | गोल्फ क्लब(ईदगाह मैदान )त्र्यंबकरोड, नाशिक | १ ते ४० | |
| २ | संदिप हॉटेल समोरील मनपा मालकीची खुल्या जागेत (कंपाऊंडचे आत) | १ ते ०८ | |
| **क)** | **पंचवटी विभाग** | | |
| १ | तपोवन येथील साधुग्राम कार्यालया, समोरील मोकळया खुल्या जागेत | १ ते १२ | विभागीय कार्यालय पंचवटी, मखमलाबादनाका,कै. पंडितराव खैरे इमारती मधील सभागृहात नाशिक |
| २ | अमृतधाम सॅनिटोरियम भिंतिसमोर विडीकामगार वसाहतीकडे जाणा-या सर्व्हिसरोड लगत अग्निशमन दल कंपाऊंडला लागून मोकळया जागेत | १ ते ४ | |
| ३ | दिंडोरीरोड आर.टी.ओ.ऑफिसकडे जाणाऱ्या लिंकरोड वरील जानकाई बंगल्याच्या दक्षिणबाजूस (लक्ष्मी बेकरीजवळ) असलेली खुल्या जागेत | १ ते ६ | |
| ४ | श्रीकृष्ण मंगल कार्यालय शेजारी,गितानगर,म्हसरुळ येथील खुल्या जागेत | १ ते ४ | |
| ५ | मखमलाबाद गांव देवी मंदिरासमोरील खुल्या जागेत | १ | |
| **ड)** | **नाशिकरोड विभाग** | | मनपा विभागीय कार्यालय नविन इमारत , दुर्गा गार्डन शेजारी , देवळाली रोड, नाशिकरोड, येथील सभागृहात |
| १ | नाशिक पुणारोड जुना पुणानाका चेहेडी,पंपीग रस्ता पवन रेस्डिन्सी जवळील खुली जागा. | १ ते २० | |
| २ | के.एन.केला शाळेशेजारी मोकळया जागेत | १ ते ४० | |
| ३ | गाडेकर मळयासमोरदत्तमंदिररोड जागेत | १ ते २० | |
| ४ | शिवाजीनगर समाजमंदिर मैदान, शिवाजीनगर पुर्व, जेलरोड | १ ते ८ | |
| ५ | मनपा शाळा क्र. १२५ मैदानालगत एस.टी. डेपो आरक्षित जागेलगत सामासिक मनपाची खुली जागा | १ ते ३० | |
| ६ | शिखरेवाडी मैदान येथील महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीच्या कार्यालया समोरील जागा . | १ ते २ | |
| ७ | नाशिक मनपा नाटयगृह आरक्षित जागा, जेलरोड स.नं.११७ पैकी जागेत | १ ते ५० | |
| **इ)** | **सातपुर विभाग** | | विभागीय कार्यालय |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सातपूर क्लब हाऊस मैदान, औद्योगिक वसाहत सातपूर | १ ते २५ | सातपूर, त्र्यंबकरोड इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात , नाशिक |
| २ | आनंदवल्ली बसस्टॉप जवळ खुली जागेत | फक्त १ | |
| **ई)** | **नविन नाशिक (सिडको) विभाग** | | विभागीय कार्यालय नविन नाशिक, अंबड पोलीस स्टेशन समोर, नाशिक |
| १ | जुने शॉपिंग सेंटर-लेखानगर पाठीमागे, शिवाजीचौक भाजी मार्केटमागे मोकळे मैदानात | १ ते ६ | |
| २ | राजे संभाजी स्टेडीयम मैदानात | १ ते १० | |
| ३ | पवननगरच्या पाण्याच्या टाकीजवळ नियोजित स्टेडियम केम्पाउंडचे मोकळे मैदानात | १ ते १२ | |

## अटी व शर्ती

१. लिलावात सहभाग नोंदविणारे फटाके विक्रेता यांनी त्यांचे रहिवासी पुरावा, स्वतःचे ओळखपत्राची दोन छायांकीत प्रत स्वः स्वाक्षरीने साक्षांकित करुन सादर करावी लागेल. (जसे मालमत्ताकर देयक/आधारकार्ड /निवडणूक ओळखपत्र /वाहन परवाना /पॅनकार्ड/लाईटबिल /बँक पास बुक.)

२. लिलावापुर्वी दि. २१ /१०/२०२१ रोजी एक तास अगोदर, अनामत रक्कम रुपये १०,०००/- रोख स्वरुपात संबंधित विभागीय कार्यालयातील जाहिरात व परवाने विभागामध्ये भरणा क्रमप्राप्त आहे.

३. यशस्वी लिलावधारकाने जागा लायसेन्स फी व्यतिरिक्त शासनाचा व्यवसाय कर भरणे क्रमप्राप्त आहे. याप्रमाणे भरणा केलेला नसल्यास अनामत रक्कम अदा केली जाणार नाही.

४. यशस्वी लिलावधारक यांनी जागा लायसेंस फी व त्यावर लागु असलेला शासनाचा वस्तु व सेवाकराची १८ % रक्कम रोख अथवा डिमांड ड्राफ्टद्वारे (डिमांडड्राफ्ट नाशिक महानगरपालिका, नाशिक या नांवाने) लिलावाच्या दिवशीच कार्यालयीन वेळेत संबंधीत विभागीय कार्यालयातील जाहिरात व परवाने विभागात भरणे बंधनकारक आहे. मुदतीत भरणा न केल्यास, अनामत जप्त करणेत येऊन सदरची खुली जागा इतर इच्छुकांना देणेत येईल.

५. यशस्वी लिलावधारकाने जागा लायसेन्स फी व त्यावरील १८ %वस्तु व सेवाकर याव्यतिरिक्त स्वच्छ पर्यावरण चार्जेस रक्कम रु. ३०००/- भरणे बंधनकारक आहे.

६. यशस्वी लिलावधारकाने, विस्फोटक नियम २००८ कलम ८४ नुसार पालन करणे बंधनकारक आहे.

७. नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचा ना-हरकत दाखला प्राप्त करणे बंधनकारक असुन, त्याकरीता असलेली प्रती दिन शुल्क रक्कम रु. ५००/- प्रमाणे आगाऊ भरणे बंधनकारक आहे.

८. यशस्वी लिलावधारकाने मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर व जिल्हादंडाधिकारी (The Explosive Act, 1884) यांचेकडे आवश्यक ते कागदपत्रे सादर करुन तात्पुरते स्वरुपातील फटाकेविक्रीचा परवाना रितसर प्राप्त करणे बंधनकारक आहे. तो पर्यंत फटाकेविक्री करणे अथवा साठा करणे इत्यादीस सक्त मनाई आहे.

९. यशस्वी लिलावधारकाने मनपाच्या जागेवर शेडची उभारणी करणे, विस्फोटक नियम २००८ कलम ८४ मधील तरतूदीनुसार आगविरहीत साधनसामुग्रीची उभारणी करणे व त्यानंतर नाशिक मनपाच्या अग्निशमन विभागाकडून पाहणी करुन ना-हरकत दाखला व विद्युत वितरण कंपनीचा ना-हरकत दाखला प्राप्त करुन मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचे कडून फटाकेविक्री परवाना स्वतःच्या नांवावर स्वतः प्राप्त करणे इ. बंधनकारक असुन त्यानंतर व्यवसाय करता येईल. असे न केल्यास कायदेशिर कारवाईस पात्र राहील.

१०. कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव रोखणे करीता शासनाचे व स्थानिक प्राधिकरणाने दिलेले सर्व मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक आहे. तसेच व्यवसाय करतांना एकावेळी ५ पेक्षा जास्त व्यक्तिंची उपस्थिती नसावी तसेच दोन व्यक्तित किमान सहा फुटाचे सामासिक अंतर राहिल याची दक्षता घ्यावी.

११. यशस्वी लिलावधारकाने दिलेल्या कालावधीत व्यवसाय करतांना वेळोवेळी पारित होणाऱ्या महाराष्ट्र शासनाचे नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१२. जागेचा नकाशा नाशिक महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाचे ‘जाहिरात व परवाने विभागात’ कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

१३. लिलाव सुरु होणेपुर्वी सविस्तर अटी-शर्तीचे वाचन करण्यात येवुन लिलाव प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

१४. लिलावाची निश्चित केलेल्या तारिख व वेळेत कार्यवाही पुर्ण न झाल्यास शिल्लक राहिलेल्या जागांचा लिलाव दुसऱ्या दिवशी सकाळी ११:०० वाजेनंतर सुरु होईल. याकरीता स्वतंत्र सुचना देण्यात येणार नाही.

१५. दिवाळी सण २०२१ निमित्तफटाके विक्रीचे तातपुरते स्टॉल/गाळेची खुल्या जागेचे जागा लायसेन्स फी चे जाहिर लिलाव नोटिसमध्ये नमूद केलेल्या प्रत्येकी १० X१० चौ. फु. च्या खुल्या जागेचा ताबा दि. २५/१०/२०२१ ते दि. ०८/११/२०२१ या कालावधीपुरता मर्यादीत राहील.

१६. यशस्वी लिलावधारकाने अग्निशमन विभाग, विद्युत विभाग, फटाके विक्री परवाना इ. परवानग्या प्राप्त करणे तसेच गाळयाची उभारणी करणे व इतर कामाकरीता दि.२४/१०/२०२१ ते दि.२७/१०/२०२१, फटाके विक्री दि. २८/१०/२०२१ ते दि.६/११/२०२१ तसेच गाळे व इतर साहित्य काढणेचा दि. ७/११/२०२१ ते दि. ८/११/२०२१ येणे प्रमाणे कालावधी निश्चित आहे.

१७. लिलाव बोलीची किमान मर्यादा र. रु. १००/- या प्रमाणे असुन, त्यापटीने बोली लागेल व किमान ३ बोली नंतर लिलाव कायम करण्यात येईल.

१८. विस्फोटक नियम २००८ कलम ८४ नुसारखालील नमुद नियमांचे पालन करणे यशस्वी लिलावधारकावर बंधनकारक आहे. त्याचे उल्लंघन झाल्यास कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

i. दोन गाळयांमधील सामासिक अंतर किमान ३ मीटर (१० फूट) ठेवणे बंधनकारक राहील
ii. एकापेक्षा जास्त स्टॉल असतील तर त्याचे प्रवेशद्वार समोरासमोर ठेवता येणार नाही.
iii. एकाच ठिकाणी ५० पेक्षा जास्त स्टॉलची उभारणी करता येणार नाही.
iv. स्टॉलच्या ठिकाणी तेलाचा दिवा, आगपेटी, मेणबत्ती, इ. वस्तूंचा वापर कटाक्षाने टाळावा.
v. फटाकाच्या स्टॉलकरिता आपत्कालीन मार्ग नेहमी खुला ठेवणे अनिवार्य आहे.
vi. गाळयाच्या बांधणीसाठी ज्वलनशील साधनसामुग्रीचा (कापड, प्लास्टीक, लाकूड इ.)वापर करण्यास सक्त मनाई आहे. गाळे शक्यतो पत्र्यापासुन बनविलेले असावेत.मात्र त्यावर कोणत्याही प्रकारचे पक्के बांधकाम करता येणार नाही.
vii. गाळयांमध्ये विद्युत संच, मांडणीमध्ये लोंबकळते दिवे लाऊ नयेत. विद्युत व्यवस्थेकरिता, विद्युत दिवे भिंत किंवा पट्टया घट्ट स्वरुपात लावलेले असावेत. तसेच विद्युतीकरणाचे उघडे जोड (open joints) ठेवु नये. विदयुत संच मांडणी शासनाचे विदयुत निरीक्षक, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लि. नाशिक यांचेकडून तपासणी करुन त्याबाबतचा सक्षम दाखला व्यवसाय परवानगी मागतांना घेतलेला असावा. तसेच विदयुत पुरवठा करतांना प्रत्येक गाळयात एक स्विच ठेवतांना जास्तीच्या एका रांगेतील गाळेंच्या ठिकाणी एक मुख्य स्विच ठेवणे बंधनकारक राहील.
viii. फटाके विक्रीच्या दुकानापासुन किमान ५० मीटर अंतराचे आत फटाके वाजविण्यास बंदी आहे. याबाबतचा खबरदारीचा फलक लावण्यात यावा.

१९. प्रत्येंक गाळयांमध्ये अग्निशामक दलाच्या सूचनेनुसार किमान आवश्यक असलेली आगप्रतिबंधक उपाययोजना खालीलप्रमाणे करणे बंधनकारक आहे -

अ) A,B,Cटाईप फायर एस्टींग्वीशर्स,६ किलोग्रॅम- १ नग ठेवावेत.
ब) बारीक वाळूच्या बादल्या-०२ नग ठेवावेत.
क) पाण्याने भरलेली बादल्या-२००/५०० लिटर ठेवणे अनिवार्य.
ड) धुम्रपान निषेध व आपत्कालीन संपर्क क्रमांक व मास्क शिवाय प्रवेश नाही (No Mask No Entry) इ. फलक – दुकानाच्या दर्शनी भागात लावणे अनिवार्य आहे.
इ) फटाके विक्री गाळयांमध्ये ज्वालाग्राही द्रव्ये (पेट्रोल/डिझेल/रॉकेल व इतर इ.) चा साठा तसेच उघडया ज्योती /पेटती मेणबत्ती इ. चा वापर निषीध्द आहे.

२०. एका व्यक्तिस/संस्थेस/गटास एकच जागा जाहिर लिलावात प्राप्त करता येईल.

२१. यशस्वी लिलावधारकाने प्राप्त केलेल्या जागेचे संबंधीत विभागाचे विभागीय अधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांचेकडुन रेखांकन करुन, त्यानुसार गाळा/स्टॉल ची उभारणी करणे अनिवार्य आहे.

२२. मा. न्यायालयाचे निर्देश, शासनाचे निर्देश/आदेश तसेच मा. जिल्हाधिकारी, नाशिक व मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी वेळोवेळी पारित केलेल्या आदेशाचे पालन करणे यशस्वी लिलावधारकावर बंधनकारक राहील.

२३. लिलावातील प्राप्त जागेबाबत सरकारी खात्याकडुन अगर स्थानिक रहिवाशांकडुन तक्रारी प्राप्त झाल्यास, नियमाप्रमाणे परवानगी रद्द करण्यात येईल.

२४. सार्वजनिक आरोग्यास कुठल्याही प्रकारची हानी पोहचणार नाही. याची दक्षता घेण्यात यावी. तसेच आजुबाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे अनिवार्य आहे.

२५. प्रत्येक स्टॉलच्या जागेचे क्षेत्र १० X १० चौ.फूट निश्चित केले आहेत, त्यापेक्षा जास्त क्षेत्राचा वापर करता येणार नाही.

२६. यशस्वी लिलावधारकाने जागे बाबत भरणा केलेली सुरक्षा अनामत मुदत संपल्यानंतर, जागा पुर्ववत स्वच्छ व जैसेथे करुन दिल्यानंतर अनामत रकमेची अर्जासह मुळ पावतीची प्रत तसेच थकबाकी नसले बाबतचा दाखला सादर केल्यानंतर, अनामत रक्कम परत अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२७. यशस्वी लिलावधारका कडुन जागेचे काही नुकसान केल्याचे आढळुन आल्यास, सदर जागेच्या दुरुस्तीकामी येणारा खर्च मनपा निश्चित करेल, व त्यानुसार सदरचा खर्चाची भरपाई, मुदतीत भरणा करणे अनिवार्य राहील.

२८. यशस्वी लिलावधारकाने, विद्युत व्यवस्था स्वखर्चाने करणे व त्यानुसार विद्युत पुरवठयाचे देयक स्वत: अदा करावयाचे आहे.

२९. यशस्वी लिलावधारकाचे, नैसर्गिक अथवा अनैसर्गिक कारणास्तव वित्त तसेच जिवीत हानी झाल्यास, त्याबाबतची कोणतीही जबाबदारी नाशिक महानगरपालिकेची राहणार नाही.

३०. यशस्वी लिलावधारकाने, फटाके विक्री व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचा अनाधिकृत व्यवसाय करता येणार नाही.

३१. यशस्वी लिलावधारकाने, कायदा व सुव्यवस्था यांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

३२. यशस्वी लिलावधारकाने, फटाके विक्री करीता ठेवण्यात आलेला वस्तु/साहित्य इ. ची सुरक्षिततेची जबाबदारी स्व:ताची असुन, त्याकरीता आवश्यक त्या सुरक्षा बाबतच्या उपायोजना, स्वत: करणे अनिवार्य आहे. याबाबत काही दुर्घटना घडल्यास त्यास नाशिक महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

३३. यशस्वी लिलावधारकाने, मनपा मालकिच्या जागेचे कोणत्याही त-हेने हस्तांतर, पोटभाडेकरु, बक्षिस, गहाण, असाईनमेंट वगैरे करता येणार नाही. अगर गुडविलने जागा परस्पर दुस-यास बहाल करता येणार नाही. तसेच जागा संपूर्णपणे अगर अशंत: दुस-याच्या नावावर करुन देता येणार नाही. तसेच जागेत भागिदार घेता येणार नाही.

३४. यशस्वी लिलावधारकाने, जागेचा सर्व परिसर स्वच्छ ठेवणे व कचरा/निर्माल्य साफसफाई करुन तो एकत्र जमा केलेला कचरा/निर्माल्य घंटागाडीत टाकणे अनिवार्य आहे.

३५. यशस्वी लिलावधारकाने, प्राप्त केलेल्या जागेत व्यवसाय न केल्यास, भरणा केलेली जागा लायसेंस फी व त्यावरील वस्तु व सेवा कर, स्वच्छ पर्यावरण शुल्क, अग्नीशमन शुल्क इ. लिलावधारकास परत अदा केली जाणार नाही, सदरची रक्कम मनपा/शासकिय खजिन्यात जमा करण्यात येईल.

३६. नाशिक महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वर नमूद केलेप्रमाणे जागांचे लिलाव तहकूब करणे अथवा त्यामध्ये बदल करणे इ. अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचे राहतील.

३७. उक्त अटी-शर्ती व्यतिरिक्त नविन अटी-शर्तींचा समावेश करणे अथवा बदल करणे इ. अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचे राहातील. त्यानुसार अटी-शर्तीचे पालन करणे यशस्वी लिलावधारकांवर बंधनकारक आहे.

| | |
|---|---|
| Sd/- | sd/- |
| उपआयुक्त (जापवि.) | आयुक्त, |
| नाशिक महानगरपालिका, नाशिक. | नाशिक महानगरपालिका, नाशिक |